# Rajarshri Shahu College, Latur And Unique Institute of Higher Learning Pvt. Ltd.

## Memorandum Of Understanding

# MPSC Integrated Batch

**राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व युनिक इन्स्टिटयूट ऑफ हायर लर्निंग प्रा. लि. यांच्यातील MoU खालीलप्रमाणे**

१) MPSC इंटिग्रेटेड बॅचमध्ये किमान ८० विद्यार्थ्यांनी प्रवेश नोंदविल्यावरच सदर कोर्स ऑफलाईन माध्यमातून राबविण्यात येईल.

२) वरील सर्व उपक्रम राबविण्याकरिता जाहिरात, भौतिक सुविधा (क्लासरूम, प्रोजेक्टर, इलेक्ट्रिसिटीची व्यवस्था, साऊंड सिस्टिमची व्यवस्था, लेक्चर बोर्ड, मार्कर इ.) उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांची असेल.

३) राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे MPSC इंटिग्रेटेड बॅच करिता मार्गदर्शनासाठी प्राध्यापक उपलब्ध करून वेळेत ऑफलाईन माध्यमातून अभ्यासक्रम पूर्ण करण्याची जबाबदारी युनिक इन्स्टिटयूट ऑफ हायर लर्निंग प्रा. लि. यांची असेल परंतू भविष्यात कोरोना किंवा अन्य कारणास्तव लॉकडाऊनची परिस्थिती निर्माण झाली तर उर्वरित अभ्यासक्रम ऑनलाईन माध्यमातून पूर्ण करण्यात येईल.

४) विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया व मार्गदर्शन शुल्क आकारणी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या मार्फत राबविली जाईल.

५) राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे शिक्षण घेत असलेल्या किंवा पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन वर्ग सुरू झाल्याच्या दिनांकापासून दर दोन महिन्यांच्या अंतराने तीन टप्प्यांमध्ये मार्गदर्शन शुल्क जमा करणे बंधनकारक असेल. इतर विद्यार्थ्यांना मात्र प्रवेश घेतेवेळी संपूर्ण मार्गदर्शन शुल्क एक रक्कमी अदा करणे बंधनकारक राहील.

६) वरील उपक्रमातून जमा होणाऱ्या फिस मधून ३०% रक्कम राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांना देय असेल व ७०% रक्कम युनिक इन्स्टिटयूट ऑफ हायर लर्निंग प्रा. लि. यांना देय असेल.

७) राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या कडून युनिक इन्स्टिटयूट ऑफ हायर लर्निंग प्रा. लि. यांना दरमहा जमा होणाऱ्या मार्गदर्शन शुल्कातून ३०% रक्कम वजा करून उर्वरित ७०% रक्कम दरमहा देय असेल परंतू ६ महिन्यांच्या कालावधीत संपूर्ण शुल्क अदा करणे बंधनकारक असेल.

८) ज्या विद्यार्थ्यांनी MPSC इंटिग्रेटेड बॅचमध्ये प्रवेश नोंदविला असेल अशाच विद्यार्थ्यांना नियमित मार्गदर्शन वर्गात प्रवेश दिला जाईल. तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांच्याकडून युनिक इन्स्टिटयूट ऑफ हायर लर्निंग प्रा. लि. यांना मार्गदर्शन शुल्क Unique Institute of Higher Learning Pvt. Ltd. या नावाने चेक/डी.डी./ पे ऑर्डर/ RTGS/NEFT या मार्फत देय असेल.

९) MPSC इंटिग्रेटेड बॅच संदर्भात कुठले बदल करणे आवश्यक असल्यास राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व युनिक इन्स्टिटयूट ऑफ हायर लर्निंग प्रा. लि. यांच्या चर्चेतून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

THE UNIQUE ACADEMY * LATUR * UNIQUE academy

RAJARSHI SHAHU MAHAVIDYALAYA (AUTONOMOUS) * LATUR *

## युनिक इन्स्टिटयूट ऑफ हायर लर्निंग प्रा. लि. यांच्याकडून सदर उपक्रमाकरिता उपलब्ध केल्या जाणाऱ्या बाबी खालीलप्रमाणे

१) प्रत्येक विषयास तज्ञ व अनुभवी मार्गदर्शक सोमवार ते शनिवार लातूर येथे उपलब्ध केले जातील.

२) प्रत्येक विषयाच्या प्रिंटेड नोटस् विद्यार्थ्यांना देण्यात येतील.

३) द युनिक प्रकाशनाची सर्व पुस्तके विद्यार्थ्यांना ४०% सवलतीत उपलब्ध करून दिले जातील.

४) MPSC (पूर्व व मुख्य परीक्षा) टेस्ट सिरिजचे आयोजन करण्यात येईल. (प्रश्नपत्रिकेवर राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या नावाचा उल्लेख करण्यात येईल.)

५) प्रत्येक महिन्यातून एकदा शिकविलेल्या अभ्यासक्रमावर सराव परीक्षा घेण्यात येईल. ज्यातून विद्यार्थ्याचा प्रगती अहवाल नोंदविला जाईल.

६) प्रत्येक महिन्याला चालू घडामोडी या विषयाची सराव परीक्षा व चर्चासत्र घेण्यात येईल.

७) विद्यार्थ्यांकरिता 'शंका – समाधान सत्र' राबविण्यात येतील.

८) विद्यार्थ्यांकरीता यशस्वी उमेदवारांचे/प्रशासकीय अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येईल.

९) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरिता विशेष सत्र राबविण्यात येतील.

१०) प्रत्येक विद्यार्थ्यास अभ्यासाच्या नियोजनाबाबत व्यक्तिगत मार्गदर्शन करण्यात येईल.

११) विद्यार्थ्यांस परीक्षेच्या प्रत्येक टप्प्यातील अडचणींबाबत समुपदेशन करण्यात येईल.

१२) मुलाखतीच्या तयारी करिता विशेष मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येईल.

THE UNIQUE ACADEMY UNIQUE academy LATUR

RAJARSHI SHAHU MAHAVIDYALAYA (AUTONOMOUS) LATUR

**राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व युनिक इन्स्टिटयूट ऑफ हायर लर्निंग प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथे राबविल्या जाणाऱ्या MPSC बॅचचा तपशील खालीलप्रमाणे**

कालावधी :- १० महिने
दिवस :- सोमवार ते शनिवार
वेळ :- दररोज २ तास
समाविष्ट घटक / अभ्यासक्रम :-

## पूर्व परीक्षा अभ्यासक्रम

### • पेपर क्र. १ (GS)

१) राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाच्या प्रचलित घडामोडी.

२) भारताचा इतिहास (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह) आणि भारताची स्वातंत्र्य चळवळ

३) महाराष्ट्र, भारत आणि जगाचा भूगोल - महाराष्ट्राचा, भारताचा आणि जगाचा प्राकृतिक, सामाजिक आणि आर्थिक भूगोल

४) महाराष्ट्र आणि भारत - राज्यव्यवस्था आणि शासन-राज्यघटना, राजकीय व्यवस्था, पंचायत राज, नागरी शासनव्यवस्था, सार्वजनिक धोरण, हक्क संदर्भातील मुद्दे इ.

५) आर्थिक आणि सामाजिक विकास - शाश्वत विकास, दारिद्रय, सर्वसमावेशकता, लोकसंख्या अभ्यास, सामाजिक सेवा धोरणे इत्यादी.

६) पर्यावरणविषयक सामान्य मद्दे - परिस्थितिकी, जैववैविध्य आणि हवामान बदल (विषयाच्या विशेषीकृत अभ्यासाशिवाय)

७) सामान्य विज्ञान

### • पेपर क्र. २ (CSAT)

१) उताऱ्यावरील प्रश्न (आकलन)

२) संवाद कौशल्यासह आंतरवैयक्तिक कौशल्ये.

३) अनुमानात्मक चाचणी आणि विश्लेषणात्मक क्षमता.

४) निर्णय प्रक्रिया आणि समस्या सोडवणूक

५) सर्वसामान्य बुद्धिमत्ता चचणी

६) मूलभूत अंकगणित (संख्या, संख्यात्मक संबंध, घातांक इ.)
सामग्री विश्लेषण (तक्ते, आलेख, टेबल,सामग्रीचा पुरेसेपणा इ.)

७) मराठी आणि इंग्रजी भाषेतील उताऱ्यावरील आकलनात्मक कौशल्ये

# मुख्य परीक्षा अभ्यासक्रम

- **भाषा पेपर – १**

  - **मराठी**

    १) निबंध लेखन

    २) भाषांतर

    ३) सारांश लेखन

  - **English**

    १) Essay Writing

    २) Translation

    ३) Precis

- **भाषा पेपर – २**

  - **मराठी**

    १) व्याकरण

    २) शब्दसंग्रह

    ३) उताऱ्यावर आधारीत प्रश्न

  - **English**

    ४) Grammar

    ५) Vocabulary

    ६) Comprehension

- **सामान्य अध्ययन पेपर – १**

  - **इतिहास**

    १) आधुनिक भारताचा (१८१८–१८५७) महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह अभ्यास

    २) भारतामधील ब्रिटिश सत्तेची स्थापना.

    ३) सामाजिक – सांस्कृतिक बदल

    ४) सामाजिक – आर्थिक जागृती

    ५) भारतीय राष्ट्रवादाचा उगम आणि विकास

    ६) गांधी युगातील राष्ट्रीय चळवळ

    ७) स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारत

    ८) महाराष्ट्रातील निवडक समाजसुधारक (त्यांची विचारसरणी आणि कार्य)

    ९) महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा (प्राचीन ते आधुनिक)

➢ **भूगोल**

**(ब) भूगोल : महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह**

१) प्राकृतिक भूगोल
२) महाराष्ट्राचा आर्थिक भूगोल
३) महाराष्ट्राचा मानवी आणि सामाजिक भूगोल
४) पर्यावरण भूगोल
५) लोकसंख्या भूगोल (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह)
६) सुदूर संवेदन

➢ **भूगोल आणि कृषी**

१) कृषी परिस्थितिकी
२) हवामान
३) मृदा
४) जल व्यवस्थापन

## • सामान्य अध्ययन पेपर – २

➢ **भारतीय राज्यघटना आणि भारतीय राजकारण (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह) आणि कायदे**

१) भारताची राज्यघटना
२) राजकीय व्यवस्था (शासनाची रचना, अधिकार आणि कार्ये)
३) राज्यशासन आणि प्रशासन (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह)
४) जिल्हा प्रशासन
५) ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन
६) शिक्षण व्यवस्था
७) पक्ष आणि दबाव गट
८) प्रसारमाध्यमे
९) निवडणूक प्रक्रिया
१०) प्रशासकीय कायदे
११) केंद्र आणि राज्य शासनाचे विशेषाधिकार
१२) काही महत्वाचे कायदे
१३) समाजकल्याण आणि सामाजिक कायदे
१४) सार्वजनिक सेवा
१५) सार्वजनिक खर्चावरील नियंत्रण
१६) कृषी प्रशासन आणि ग्रामिण अर्थव्यवस्था
१७) लोकप्रशासनातील संकल्पना, दृष्टिकोन आणि सिद्धांत
१८) सार्वजनिक धोरण



RAJARSHI SHAHU MAHAVIDYALAYA (AUTONOMOUS) LATUR
UNIQUE INSTITUTE OF HIGHER LEARNING PVT. LTD.

## • सामान्य अध्ययन पेपर – ३

### ➢ (अ) मानवी साधनसंपत्तीचा विकास

१) भारतातील मानवी साधन संपत्तीचा विकास

२) शिक्षण

३) व्यावसायिक शिक्षण

४) आरोग्य

५) ग्रामीण विकास

### ➢ (ब) मानवी हक्क

१) मानवी हक्कांची वैश्विक सनद

२) बाल विकास

३) महिला विकास

४) युवक विकास

५) आदिवासी विकास

६) सामजिकदृष्टया मागासवर्गाचा विकास

७) वृद्ध कल्याण

८) कामगार कल्याण

९) विकलांग व्यक्तींचे कल्याण

१०) पुनर्वसन

११) आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटना

१२) ग्राहक संरक्षण

१३) मूल्ये आणि नैतिकता

## • सामान्य अध्ययन पेपर – ४

### ➢ (अ) अर्थव्यवस्था आणि नियोजन

१) भारतीय अर्थव्यवस्था

२) ग्रामीण आणि नागरी पायाभूत संरचना विभाग

३) उद्योग

४) सहकार

५) आर्थिक–सुधारणा

६) आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आंतरराष्ट्रीय भांडवल संचार

७) दारिद्रय मोजणी आणि अंदाज

८) रोजगार निर्मिती निश्चित करणारे घटक

९) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था

RAJARSHI SHAHU MAHAVIDYALAYA (AUTONOMOUS) * LATUR *



UNIQUE INSTITUTE OF HIGHER LEARNING PVT. LTD.

➢ **(ब) विकासाचे अर्थशास्त्र आणि कृषी**

१) समग्रलक्षी अर्थशास्त्र

२) सार्वजनिक वित्त आणि वित्तीय संस्था

३) वृद्धी, विकास आणि आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र

४) भारतीय कृषी, ग्रामीण विकास आणि सहकार

५) कृषी

६) अन्न आणि पोषण

७) भारतीय उद्योग पायाभूत सुविधा व सेवा क्षेत्र

➢ **(क) विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास**

१) ऊर्जा

२) संगणक आणि माहिती -तंत्रज्ञान

३) अवकाश-तंत्रज्ञान

४) जैव तंत्रज्ञान

५) भारताचे आण्विक धोरण

६) आपत्ती व्यवस्थापन

# Fees Structure of Above Courses :-

| Sr. No. | Course | Fees | Duration | Mode |
|---|---|---|---|---|
| 1) | MPSC Integrated Course | 35,000/- | 10 Month | Offline |

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व युनिक इन्स्टिटयूट ऑफ हायर लर्निंग प्रा. लि. या दोन्ही संस्थेना वरील नमूद सर्व बाबी मान्य असून भविष्यात वरील बाबीमध्ये बदल करणे आवश्यक असल्यास राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व युनिक इन्स्टिटयूट ऑफ हायर लर्निंग प्रा. लि. यांच्यात चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

**राजर्षी शाहू महाविद्यालय करिता,**

नाव :- डॉ. महादेव गव्हाणे

पद :- प्राचार्य

स्वाक्षरी:- [signature]

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय
(स्वायत्त), लातूर

संस्थेचा शिक्का :- RAJARSHI SHAHU MAHAVIDYALAYA (AUTONOMOUS) * LATUR *

**युनिक इन्स्टिटयूट ऑफ हायर लर्निंग प्रा. लि. करिता,**

नाव :- मल्हार पाटील

पद :- संचालक

स्वाक्षरी:- Mallar Pat

संस्थेचा शिक्का :- UNIQUE INSTITUTE OF HIGHER LEARNING PVT LTD

**युनिक इन्स्टिटयूट ऑफ हायर लर्निंग प्रा. लि. करिता,**

नाव :- तुकाराम जाधव

पद :- संचालक

स्वाक्षरी:- [signature]

संस्थेचा शिक्का :- UNIQUE INSTITUTE OF HIGHER LEARNING PVT LTD